MHBI160018602022

**नियमीत दिवाणी दावा क्र.११८५/२०२२**

**अशोक वि. उमाजी व इतर**

**निशाणी ३४ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त नेमणुकीबाबत देण्यात आलेला आहे.

२. वादींचे कथन असे आहे की, वादींनी प्रस्तुतचा दावा मालकी हक्क जाहीर होवुन निरंतर मनाई हुकुम मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रतिवादींनी त्यांची कैफियत दाखल करुन दावा मिळकत गट नं.२५३ क्षेत्र ०.२२ आर पैकी ०.०५ आर. जमीन पडीक असून ०.१० आर. मध्ये पाण्याचे शेततळे आहे व उर्वरित ०.०७ आर. ही जमीन नदीमध्ये गेली आहे. त्यामुळे वादीस गट नं.२५३ मध्ये क्षेत्र राहिलेले नाही असे कथन करुन वादींची दावा मिळकतीवरील मालकी व ताबे वहिवाट नाकारली आहे. परंतु, वादी हे दावा मिळकत वहिवाटुन उत्पन्न घेत आहेत आणि त्यास प्रतिवादी हरकत अडथळा करित आहेत. प्रतिवादींनी दाव्यासह दाखल नकाशात दर्शविल्याप्रमाणे नदीच्या पूर्वेकडील वादीचे ०६ आर क्षेत्र नाकारले आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यात मिळकतीच्या हद्दीखुणांचा वाद निर्माण झाला आहे. करिता, वादींनी उपअधिक्षक भूमि अभिलेख शिरूरकासार यांच्यामार्फत वादग्रस्त मिळकतीची मोजणी होवून वादग्रस्त मिळकतीत किती क्षेत्रावर शेततळे आहे, किती क्षेत्रात मधुन नदी गेली आहे आणि नदीच्या पूर्वकडे वादीचे ताब्यात किती क्षेत्र आहे याबाबत अहवाल मागवण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, यापूर्वी प्रतिवादींनी निशाणी २७ वर न्यायालयीन आयुक्त नेमणुकीचा अर्ज दाखल केला होता. त्यास वादीने हरकत नोंदविली होती. निशाणी २७ वरील आदेश नामंजुर करण्यात आला आहे.

त्यामुळे वादीचा पुन्हा न्यायालयीन आयुक्त नेमणुकीचा अर्ज मंजुर करता येणार नाही. शेवटी, प्रतिवादींनी सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली.

४. वादींचा अर्ज व त्यावरील म्हणणे आणि अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीने प्रस्तुतचा दावा हा मालकी हक्क जाहीर होवून निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे दावा मिळकतीवरील मालकी व कब्जेवहिवाट शाबीत करण्याची जबाबदारी वादीची आहे. उलटपक्षी प्रतिवादींनी त्याचे बचावात वादीचे गट नं.२५३ पैकी १० आर. क्षेत्र शेततळे, ०५ आर. क्षेत्र नापीक आणि ०७आर. क्षेत्र नदी करीता गेल्याने वादीस गट नं.२५३ मध्ये वहिवाटीकरीता मिळकत नसल्याचा बचाव घेतला आहे. सदरचा बचाव शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादींची आहे. अशा परिस्थितीत वादींना त्यांची केस शाबीत करण्याकरीता न्यायालयीन यंत्रणेची मदत घेता येणार नाही व त्या अनुषंगे न्यायालयाच्या मदतीने वादीस त्यांची बाजु शाबीत करता येणार नाही. वादीच्या मागणीप्रमाणे न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक केल्यास पुरावा गोळा करण्याकरीता वादीस न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक केल्यासारखे होणार आहे. त्यामुळे वादीच्या मागणीप्रमाणे न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करता येणार नाही. परिणामी, वादीचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र नाही. करीता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP

Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.03.13 11:53:05 +0530

**(अ.सं. जगताप)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
शिरुरकासार.

दिनांक १२/०३/२०२६

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
[Sagar S. Ajabe]
Stenographer Grade-3

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 12/03/2025 |
| Transcribed on | : | -------------- |
| Checked & signed on | : | 12/03/2025 |